Time : 3 Hours

# MARATHI LANGUAGE II

Subject Code

| H | 4 | 4 | 2 | 3 |
|---|---|---|---|---|

Total No. of Questions : 42 (Printed Pages : 8) Maximum Marks : 80

**सूचना :** (*i*) शुद्धलेखनाचे नवीन नियम पाळावेत.

(*ii*) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

## विभाग-1 : व्याकरण

**खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा :**

1. माता 1
2. भीषण 1
3. पोरका 1

**खालील शब्दांची विशेषणे लिहा :**

4. कष्ट 1
5. सुगंध 1
6. प्रेम 1

**खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :**

7. भाग्यहीन 1
8. आनंद 1
9. विश्वास 1

**खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा :**

10. देव 1

11. गाय 1

12. शेजारी 1

**खालील शब्दांचे वचन बदलून लिहा :**

13. भाकरी 1

14. शेळ्या 1

15. मंदिरे 1

**खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा :**

16. माझ्या. खोलीजवळ आलो आणि पाहतो तो दाराला कुलूप. 4

## विभाग-2 : गद्य

**खालील शब्दांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :**

17. 'यत्नदेवाची उपासना' या पाठात सांगितलेली **तीन** प्रकारची माणसे कोणती ? 1

18. लेखक दिवाकर यांनी प्रतिष्ठा मिळवून दिलेल्या वाङ्मयप्रकाराचे नाव काय ? 1

19. 'उदार पितृहृदय' या पाठातील श्यामला मुले कोणत्या टोपण नावाने हाक मारीत असत ? 1

**खाली दिलेली वाक्यें योग्य पर्याय निवडून पूर्ण करा :**

20. आईने दळून ठेवलेले पीठ यमुनाबाईच्या घरी पोचवितो आणि तसाच .................... 1

(अ) सामान घेऊन मी लवकरच परत येतो!

(आ) दवाखान्यात जाऊन मी लवकरच परत येतो!

(इ) माधुकरी मागून मी लवकरच परत येतो!

21. 'श्री मंगेश'च्या उग्र तरी मायाळू वाटणाऱ्या चित्राप्रमाणे .................... 1

(अ) टिळकांची ती तसबीर देवस्वरूप वाटायची

(आ) गांधीजींची ती तसबीर देवस्वरूप वाटायची

(इ) बाबासाहेबांची ती तसबीर देवस्वरूप वाटायची

22. आपण द्विवेदी नाही, त्रिवेदी नाही, चतुर्वेदी नाही तर आपण सारेजण .................... 1

(अ) अहंवेद असतो

(आ) सामवेद असतो

(इ) अंधश्रद्ध असतो

**खालील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :**

23. ''चला चालते व्हा इथनं! एकच भाकरी आहे माझ्या घरात. माझ्या पोरांना हवी ती!''. 5

**किंवा**

''फॉर्म भरतोय म्हणजे लगेच वाईट काय मनात येतं तुझ्या ? नेत्रदानासारखं पुण्य नाही दुसरं!''

**खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळींत लिहा :**

24. डॉक्टर रघुनाथ माशेलकर यांच्या आयुष्यात जादूचा दिवस कसा उगवला ? 5

**किंवा**

'काझीरंगा अभयारण्य' या पाठात शिकाऱ्याने गेंड्याच्या संदर्भात कोणती हकीकत लिहून ठेवली आहे ?

## विभाग-3 : पद्य

**खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :**

25. संत एकनाथ महाराजांच्या गुरूंचे नाव सांगा. 1

26. 'सागरा प्राण तळमळला' या कवितेत एकाच आचमनात समुद्र प्राशन करणारे ऋषी कोण ? 1

27. कवी बा. भ. बोरकरांच्या मते माणसाची पावले कशी असावीत ? 1

**खाली दिलेल्या कवितेच्या ओळी योग्य पर्याय निवडून पूर्ण करा :**

28. .................. संगतीने समज। ध्यानि आणुनि पुरतें उमज॥ 1

29. शस्त्रधारी निष्ठुरांशी .................. झुंजले। 1

30. गुंतलेले प्राण ह्या .................. माझे। 1

(शांतीवादी, घरात, संतांच्या, रानात, नभाने)

खालील पद्याशाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :

31. जीवनावेगळे मत्स्य तळमळती। झाले मजप्रती तैसे आता॥ 5

किंवा

गनवेश फाटलाय पन चालंल मला।

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळींत लिहा :

32. संत सावता माळी यांनी आपला व्यवसाय आणि विठ्ठल भक्ती यांची एक वाक्यता कशी साधली आहे ? 5

किंवा

जीवनाकडे पाहण्याचा कोणता दृष्टिकोन 'सांगा कसं जगायचं' या कवितेतून प्रकट झाला आहे ?

## विभाग-4 : लेखन

खाली दिलेल्या वाक्प्रचारांना त्याखाली दिलेल्या अर्थाचा योग्य पर्याय निवडून लिहा :

33. नाकाने कांदे सोलणे .................... 1

- शांतपणे दाखवणे
- काळजी नसणे
- कार्य साधणे
- शिष्टपणा दाखवणे

34. पोट धरून हसणे .................... 1

- आरडाओरडा करणे
- अस्वस्थ होणे
- मोठ्याने हसणे
- खुलून दिसणे

35. मोडीत घेणे .................... 1

- स्वस्तात घेणे
- आरामात घेणे
- महागात पडणे
- मारून घेणे

36. हुज्जत घालणे .................... 1

- बेदम मारणे
- वाद घालणे
- लवकर संपविणे
- उतावीळ होणे

**खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

व्यसन हा एक मानसिक आजार होऊन बसला आहे. दारू, सिगरेट, तंबाखू इत्यादी मादक अंमली पदार्थांच्या सेवनाने मानवी शरीरावरती मोठा परिणाम होत आहे. या मादक पदार्थांच्या सेवनाने जीवनातील दु:ख, ताण व नैराश्य दूर होतं, अशी एक खोटी सबब काही जणांकडून दिली जाते. मात्र त्यात काही तथ्य नाही. एकदा नशा उतरला की माणूस पुन्हा त्याच फेऱ्यात अडकतो.

आजचा युवावर्ग मित्रांच्या दबावामुळे, आग्रहाखातर, चुकीच्या कल्पनेमुळे, एक स्टाईल, थ्रिल, मौजमजा, जोश, जगावेगळं काहीतरी करण्याच्या विचाराने व्यसनाकडे वळत आहे. या व्यसनाशिवाय तो राहू शकत नाही आणि ते मिळाले नाही तर कोणत्याही थरापर्यंत जाण्यासाठी तयार आहे. मात्र आपल्या या वागण्याने आपण नातेवाईका पासून दूर जात आहोत, सामाजिक जीवनात बदनाम होत आहोत, आयुष्याची एक एक पायरी खाली उतरत आहोत, याचा त्यांना विसर पडत आहे. त्यामुळे प्रत्येकाने व्यसनमुक्त राहून चांगले जीवन जगण्याचा प्रयत्न करावा. युवकांनी आपल्या अंगी असलेल्या छंदांचा व्यासंग बाळगावा. जीवनातील नैराश्य घालविण्यासाठी विविध खेळ खेळा, वाचन करा, व्यायाम करा, चांगले मित्र जोडा व सामाजिक जीवनात कार्यरत रहा. तुमचं जीवन सुंदर बनेल.

गुलदस्ता : मृणालिनी कुलकर्णी

**प्रश्न :**

37. व्यसनाबद्दल कोणती खोटी सबब दिली जाते ? 1

38. आजचा युवक व्यसनाकडे का वळत आहे ? 2

39. जीवनातील नैराश्य घालविण्यासाठी युवकांनी काय करायला हवे ? 2

40. 'प्रेरणा उच्च माध्यमिक विद्यालय' फोंडा येथे संपन्न झालेल्या 'राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाचे उद्घाटन' कार्यक्रमाचा वृत्तांत **10-12** ओळींत लिहा. 5

41. 'विद्यार्थी आणि भ्रमणध्वनी' (मोबाईल) या विषयावर दोन मित्र/मैत्रिणीमधील संवाद सुमारे **10** ते **12** ओळींत लिहा. 5

42. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **25** ओळींचा निबंध लिहा : 10

आधुनिक ज्ञानयोगी - आचार्य विनोबा भावे

**किंवा**

रस्त्याचे आत्मकथन

**किंवा**

प्राणी बोलू लागले तर

**किंवा**

वाढते पर्यटन व गोव्यासमोरील आव्हाने

**किंवा**

माझा आवडता ऋतू.